

# आमच्या गल्लीची स्वच्छता मोहीम !

स्नेहा पंडित

वाकोला ब्रिजवरून उजवीकडे वळल्यावर ''जिथे दोन मोठे कचऱ्याचे डबे ओसंडून वहात असतात, गाई डब्यात तोंड खुपसून खायला शोधत असतात, कुत्रे प्लॅस्टिकच्या पिशव्या ओढून इतस्तत: कचरा पसरवित असतात'' तिथे डावीकडे वळा - असं आमच्याकडे (गल्लीत) येणाऱ्यांना आम्ही खूण म्हणून सांगत असू! हे चित्र अशोकनगर लेन, या सांताक्रूजमधील गल्लीचं.

सुदैवाने, जवळच राहणाऱ्या माझ्या मैत्रिणीच्या घरी एकदा मुंबई महानगर पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाचे अधिकारी श्री. सुभाष दळवी यांची भेट झाली. त्यांनी सांगितलेल्या माहितीवरून व त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या गल्लीतील कचऱ्यांचा प्रश्न सोडवावा असे फारच तीव्रतेने मनात आले.

आमच्या गल्लीत एकूण 20 बिल्डिंग्ज व लागून असलेली 100 बैठ्या घरांची वस्ती यापैकी 7-8 बिल्डिंगमधील ओळखीच्या महिलांना बोलावून घरीच पहिली मिटिंग घेतली. कारण कचरा आणि पाणी हे प्रामुख्याने महिलांचेच प्रश्न! पण ''सर्वांनी सहकार्य केलं तर कोपऱ्यावरचा लाजीरवाणा घाणीचा डोंगर नाहीसा होऊ शकतो'' ही कल्पना सगळ्यांना अपील झाली. कानगोष्टी सारखी (व्हीस्परींग कँपेन) ही बातमी सर्व 20 बिल्डींगपर्यंत पोचली. मग महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत सर्व बिल्डिंगच्या प्रतिनिधींची (सेक्रेटरी अधिक या कामात मदत करू शकणारे) एकत्र बैठक घेतली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे महिलांबरोबरच काही पुरुषांनीही या कामात रस दाखविला व पुढे मदतही केली.

सर्व बिल्डिंगमध्ये दुकानांच्या बाहेरील भींतींवर 'ओला कचरा - सुका कचरा' वेगळा कसा करावा हे दाखविणारी पोस्टर्स (जी महानगरपालिकेकडून मिळतात) लावले. बिल्डिंगमधला कचरा घेऊन जाणाऱ्या बायांनाही यात सामील करून घेतलं. कचऱ्यांनी घंटागाडी सुरू करण्यासाठी एकिकडे महानगरपालिकेत बोलणी सुरू होती. आमच्यापैकी एकाने इंटरनेट वरून ॲडव्हान्स लोकॅलिटी मॅनेजमेंट विषयी माहिती काढली आणि कॉलनीतीलच एका वकिलांच्या मदतीने वेगवेगळ्या बिल्डिंगमधील एक-एक मेंबर घेऊन तसेच वस्तीतील दोन प्रतिनिधी घेऊन कमिटी तयार केली.

कमिटीची दर आठवड्याला एक मिटिंग होतच होती, शिवाय वेगवेगळ्या कामांनिमित्त मी सर्वांशी सतत संपर्कात रहात होतो. दरम्यान घाटकोपरच्या जोशी लेनला जिथे असं काम आधी झालं होत - आम्ही 10-12 जणांनी भेट दिली. त्यामुळे झाडे लावून गल्लीचे सुशोभिकरण करणे तसेच गांडूळखत तयार करणे हे नवीन विषय सुरू झाले.

आमच्या कमिटीत एक वकील, डॉक्टर, इंजिनिअर तसेच बँकेत काम करणारी मंडळी असल्यामुळे खूपच मदत झाली. शिवाय काही व्हॉलेंटिअर्सही होते. गल्लीच्या नाक्यावर कचराकुंडी असल्याने बाहेरूनही तिथे कचरा फेकला जात होता. आसपासच्या हॉटेलमधील भाजीपाल्याचाच कचरा नव्हे तर उरलेसुरले अन्नही तिथे टाकले जाई. अशा सर्वांना शिस्त लावणे मोठे जिकीरीचे काम होते. परंतु ग्रुपने एकत्र फिरून घराघरातून या कामासाठी जागृती केली.15 दिवस सर्व मेंबर्सनी रात्री 9 ते 12 ही वेळ वाटून घेऊन अक्षरशहा वॉचमनची ड्यूटी केली.

पण म्हणतात ना 'प्रथमाग्रासे मक्षिकापात' तसेच काहीसे झाले. 1 ऑगस्टपासून कचऱ्याची गाडी सुरू होणार म्हणून सकाळी 11 वाजतापासून सायंकाळी 4 वाजेपर्यंत गाडीची वाट पाहिली. शेवटी सायंकाळी 6च्या सुमारास गाडी आली आणि दुसऱ्या दिवशीपासून सकाळी 11 ते 12च्या दरम्यान रोज गाडी सुरू झाली. अशी रीतीने डब्यात पडणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी झाल्यावर महानगरपालिकेकडून एक डबा कमी केला. दुसरा मागे हटवून रस्ता रुंद आणि स्वच्छ दिसेल अशी काळजी घेतली. या बदलामुळे स्वाभाविकच लोकांना आमच्या कामाबद्दल विश्वास वाटू लागला.

मग रोज 50 पैसे फक्त प्रमाणे महिन्याचे रु. 15– तर वर्षाचे रु. 180/- या हिशेबाने आम्ही सर्वांना (घरटी) रु. 200/- द्या असे आवाहन केले. त्याबदली आपण कचऱ्याचा दुसरा डबाही हटवून तिथे बाग करू. संपूर्ण गल्लीचे सुशोभिकरण करूया असे सांगितले. बहुतेक वेळी रात्री 9 नंतर व रविवारी हे मदत फेरीचे काम चालायचे. आमचे काम प्रत्यक्षात दिसू लागल्याने खूप जणांनी चांगली मदत केली कोणी जास्त पैसे दिले, तर काहींनी झाडे आणून दिली. तर आणखी कोणी प्रत्यक्ष झाडे लावायलाही मदत केली. सांताक्रूजलाच राहणारे श्री. विनोद तावडे यांनीही आमदार निधीतून भरघोस मदत केली.

अर्थात ज्या कोपऱ्यावर पूर्वी कचरा ओसंडून वहात असे तिथे आज छोटेखानी त्रिकोणी गार्डन तयार झाली आहे. संपूर्ण गल्लीत झाडे लावली आहेत. आता सर्व कचरा गाडीतच जातो. ज्या शंकेखोरांनी (तसे ते सगळीकडेच असतात) हे होणे शक्यच नाही. असा दावा केला होता त्यांनीही शेवटच्या आभार प्रदर्शनाच्या सभेत येऊन आमचे अभिनंदन केलेच, वर स्वत:चे रु. 200/- ही दिले! गल्लीतील सर्व लोकांत या कामामुळे थोडाफार एकोपा निर्माण झाला ही खरी जमेची गोष्ट.

**प्रकल्प समन्वयक**

■ ■ ■ ■ ■

